**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६१ दिनांक २५/१०/२०२४**

# विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींवर पालघर पोलीसांकडून कारवाई

आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरूध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांचेकडून खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

कासा पोलीस ठाणे हद्दितील मौजे दाभाडी बोरपाडा येथील एका इसमाकडे विनापरवाना अग्निशस्त्र असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. सदर माहितीच्या अनुषंगाने दि. २३/१०/२०२४ रोजी २०.४५ वा. चे सुमारास नमुद ठिकाणी छापा टाकला असता आरोपी नावजी जान्या हाडळ, वय ६५ वर्षे, रा. दाभाडी बोरपाडा ता. डहाणु जि. पालघर याचे ताब्यात १) एक १२ बोअर बंदुक, २) ३ जिवंत काडतुसे, ३) ५ रिकामे काडतुसे, ४) सुमारे ३०० ग्रॅम शिसा धातुचे लहान-मोठे तुकडे असा एकुण १०,७५०/- रु. किमंतीचे घातक शस्त्रे विनापरवाना जवळ बाळगली असतांना मिळुन आल्याने नमुद इसमास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातील घातक हत्यारे जप्त करण्यात आली आहेत. नमुद इसमाचे विरुध्द कासा पोलीस ठाणे गु.र.नं. १७९/२०२४ भारतीय हत्यार अधिनियम कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री. विलास कोथे नेम. कासा पो. ठाणे हे करीत आहेत.

तसेच गुप्त बातमिदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार मनोर पोलीस ठाणे हद्दित दि.२४/१०/२०२४ रोजी दुपारी ०२.२० वाजता चिल्हार फाटा फाईव्ह स्टार ढाबा येथे इसम नामे १) अजयकुमार ऊर्फ मनिषकुमार संतराम पाल वय १८ वर्षे २ महिने मुळ राहणार ग्राम बनगरपुर ता.जि.बस्ती राज्य उत्तरप्रदेश २) रंजीतसिंग महेशसिंग ठाकुर वय १८ वर्षे १ महिना सध्या राहणार ग्राम घर क्र.२०३६ पोस्ट ऑफीस जवळ आलीपुर गडी मुळ राहणार सोणीपुरवा पो.पोआईमा जिल्हा प्रयागराज राज्य उत्तरप्रदेश यांचे कब्जात दोन गावठी पिस्टल ६ जिवंत काडतुसे असे एकुण ८६,०००/- रुपये किंमतीचे घातक अग्निशस्त्रे विनापरवाना बाळगल्याचे मिळून आल्याने त्यांचे विरुध्द मनोर पोलीस ठाणे ॥ ३४२/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढिल तपास हा पोउपनि/संग्राम पाटील, नेमणुक मनोर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, मा. श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री. गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, श्री. अभिजीत धाराशिवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पोनि/प्रदिप पाटील, सपोनि/अनिल व्हटकर, पोउनि/रोहीत खोत, पोउनि/स्वप्नील सावंतदेसाई, श्रेपोउपनि/सुनिल नलावडे, पोहवा/संदिप सुर्यवंशी, पोहवा/नरेंद्र पाटील, पोहवा/कैलास पाटील, पोहवा/दिनेश पाटील, पोहवा/दिपक राऊत, पोहवा/दिलीप जनाठे, पोहवा/संतोष निकोळे, पोहवा/मुदसर दांडेकर, पोना/हेमंत भांगरे, पोअं/विशाल नांगरे सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी केलेली आहे.